मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांच्या
स्मरणार्थ स्मृतिस्तंभ उभारणे.
शासन निर्णयातील अटी शिथील करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.हुस्माक-१०९७/प्र.क्र.७१/९७/स्वासैक-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३१ मार्च, २०००.

वाचा :- शासन निर्णय क्र.हुस्माक-१०९७/प्र.क्र.७१/९७/स्वासैक-१, दि. १६.१२.१९९८.

**शासन निर्णय :-**

वर उल्लेख केलेल्या शासन निर्णयान्वये मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ मराठवाडयातील प्रत्येक जिल्हयात एक स्मृतिस्तंभ उभारण्यासंबंधात करावयाच्या कार्यवाही बाबत आदेश देण्यात आले होते. या आदेशांमध्ये शिल्पकाराला शिल्पाची किंमत देण्यासंबंधात व शिल्पाचे काम करताना घ्यावयाची खबरदारी याबाबत काही अटी घालण्यात आल्या होत्या. त्यातील काही अटी शिथील करण्याची व काही अटी रद्द करण्याची मागणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनाकडे केली होती. या मागणीचा विचार करुन शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

२. वर उल्लेख केलेल्या दि. १६ डिसेंबर, १९९८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५ व ६ मध्ये घालण्यात आलेल्या पुढील अटी या शासन निर्णयाव्दारे रद्द करण्यात येत आहेत :-

परिच्छेद ५ (ड) :- "प्रत्येक शिल्पाचे वजन ६ टन असावे त्यापेक्षा कमी असल्यास त्या प्रमाणात किंमत कमी करण्यात येईल".

परिच्छेद -६(क) :-" शिल्पकाराने विहित केलेल्या वेळेपर्यंत काम पूर्ण न केल्यास शिल्पकाराला दरमहा रु.१००/- याप्रमाणे नुकसान भरपाई भरावी लागेल".

३. तसेच परिच्छेद ५ (क)मधील अटीत खालील सुधारणा करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयातील " शिल्पाची किंमत प्रत्येकी २५% ,५०%, २५% याप्रमाणे देण्यात येईल. सर्व सातही शिल्पांची किंमत एकदम देण्यात येणार नाही ". ही अट शिथील करुन शासन आता असा निर्णय देत आहे की, आता शिल्पकाराला अदा करायची रक्कम "प्रकल्पाचे काम सुरु झाल्यावर एकूण रकमेच्या २५% , प्रकल्पाचे काम ७०% पूर्ण झाल्यावर २५% व प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यावर ५०% याप्रमाणे देण्यास" या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

४. मराठवाडयातील सातही जिल्हयात स्मृतिस्तंभ उभारणीचे काम १७ सप्टेंबर,१९९९ रोजीच पूर्ण झाले असल्यामुळे शिल्पकाराची उर्वरित देयके त्वरित अदा करण्याबाबत विभागीय आयुक्तांनी कार्यवाही करावी.

५. मराठवाड्यात हिंगोली जिल्हा नवीन निर्माण करण्यात आला असून तेथेही स्मृतिस्तंभ उभारणीचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर स्मृतिस्तंभाच्या कामाबाबतही दिनांक १६ डिसेंबर १९९८ मधील व या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने व त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ६१२७/प्र.क्र.४२०/व्यय-४, दिनांक १४.३.२००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( श्री.वि.नलावडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. परिवहन मंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. अध्यक्ष, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद,
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
महालेखापाल (लेखा परिक्षा ) महाराष्ट्र- मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद विभाग,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
विभागीय आयुक्त औरंगाबाद,
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी, औरंगाबाद विभाग,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद विभाग (व्यय-४),
मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
उप सचिव, (आस्थापना) सा.प्र.वि., मुंबई,
उप सचिव ,वित्त विभाग, (व्यय-४),
उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
अवर सचिव, (रोख शाखा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग, का. क्र.२५, मंत्रालय, मुंबई .
निवड नस्ती /स्वासैक-१